# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०२१—२२/०३
दिनांक — ०८ डिसेंबर, २०२१

परिपत्रक

समाज कल्याण आयुक्तालय यांच्या पत्र क्रमांक CSW/Edu/DBT/2021-22/3200 दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे 'अनुसूचित जाती' च्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी पुर्ण शुल्क भरण्याबाबत सक्ती केल्याच्या अनेक तक्रारी कार्यालयात प्राप्त होत आहेत, असे नमुद केले आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क देण्याच्या योजने अंतर्गत आकारावयाच्या शुल्काबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क./आयसीसी/२०१८—१९/१५, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ मध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच परिपत्रक क्र.वि.क./आयसीसी/२०२०—२१/०४, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ या परिपत्रकानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नमुद केलेले शुल्क आकारण्यात यावे, अन्य कोणतेही शुल्क आकारण्यात येवू नय, अन्यथा अशा महाविद्यालया विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कोविड महामारी मुळे अनेक कुटुंब आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी करू नये, नियमाव्यतिरिक्त शुल्क भरण्यास दबाव आणू नये. अशा परिस्थितीमुळे अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील.

वरिल सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

(सुधीर श. पुराणिक)
कुलसचिव

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :—
सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित मानव्यशास्त्र (Humanities), विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology), वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) आणि आंतरविद्याशाखा (Interdisciplinary) शाखेतील सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था, विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये व संस्था, (अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्यांक महाविद्यालये)

(सुधीर श. पुराणिक)
कुलसचिव